F:\My Documents - 2026\Transport Engineer-2026\Advertisement for Transport Eng -2026 Walk In Interview.docx


# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@chhsambhajinagarmc.org, estl@chhsambhajinagarmc.org


जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२६/४२८. दिनांक – २५/०३/२०२६

## सविस्तर जाहिरात

आयुक्त,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हे वाहतूक अभियंता (Transport Engineer) या पदासाठी कंत्राटी तत्वावर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

संबंधित उमेदवारांनी दि.१०/०४/२०२६ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह लेखी अर्ज सामान्य प्रशासन विभाग,मुख्य प्रशासकीय इमारत,छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहील. सदर पदासाठीची अर्हता, कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | पदाचे नांव व कामाचे स्वरुप | पद संख्या | अर्हता व प्राधान्य |
|---|---|---|---|
| १ | वाहतूक अभियंता<br><br>रस्ते,वाहतूक सिग्नल, सार्वजनिक वाहतूक आणि लॉजिस्टिक्स नेटवर्क या सारख्या वाहतूक व्यवस्थांचे नियोजन, डिझाइन आणि व्यवस्थापन यावर काम करणे. | ०१ | १) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा ट्रॉन्सपोर्टेशन इंजिनिअरिंगमध्ये बी.ई. किंवा बी.टेक. या विषयासह (वाहतूक अभियांत्रिकी, महामार्ग अभियांत्रिकी, वाहतूक नियोजन, फुटपाथ डिझाइन)<br>२) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग अथवा ट्रॉफिक इंजिनिअरिंग किंवा प्लॉनिंगमध्ये एम.टेक. किंवा एम.ई. प्राधान्य.<br>३) विशेष प्राविण्य –<br>• वाहतूक प्रवाहन विश्लेषण<br>• रस्ता सुरक्षा डिझाइन<br>• वाहतूक नियोजन<br>• AutoCAD, VISSIM, ArcGIS यासारख्या सॉफ्टवेअरचा वापर<br>४) अनुभव –<br>• शासकीय कार्यालय(पीडब्ल्युडी.वाहतूक विभाग)<br>• राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग<br>• मेट्रो व रेल्वे प्रकल्प<br>• खाजगी पायभूत सुविधा कंपन्या<br>उक्त कार्यालयातील ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

**सर्वसाधारण अटी :-**

१. अर्जासोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ जोडावे.
२. सदरची नियुक्ती ही ११ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील.
३. उमेदवाराचे वय ६० वर्षापेक्षा अधिक नसावे.
४. संबंधितास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.
५. संबंधित शारीरिक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
६. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.
७. संबंधितास महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळणार नाहीत.
८. सदर कामासाठी मानधन रु.६०,०००/- प्रतिमाह देण्यात येईल.
९. संबंधितास नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपविलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.
१०. संबंधितास सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत त्यांनी पूर्ण करणे आवश्यक राहील. विभाग प्रमुख हे वेळोवेळी त्यांच्या कामाचा आढावा घेवून त्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील.
११. संबंधितास प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांबाबत/माहितीबाबत व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.
१२. सदर जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान १५ दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.
१४. उक्त अटी मान्य असल्याबाबत रु.५००/-मुद्रांकावर नोटरी करुन सादर करावे लागेल.

आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :- २५/०३/२०२६.

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा.आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

विषय – वाहतूक अभियंता (Transport Engineer) या पदासाठी कंत्राटी तत्वावर घेणेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीपूर्वक अर्ज करतो/करते की,मी वाहतूक अभियंता (Transport Engineer) या पदासाठी कंत्राटी तत्वावर काम करण्यास इच्छुक असून माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे पूर्ण नांव | |
| 2 | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| 3 | जन्म तारीख | |
| 4 | मोबाईल क्रमांक | |
| 5 | Email ID | |
| 6 | शैक्षणिक अर्हता | |
| 7 | विशेष प्राविण्य | |
| 8 | कामाचा अनुभव | |

स्थळ :-

दिनांक :-

स्वाक्षरी